IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** कराड तालुका **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0235 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/05/2021 22:09 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 12/05/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/05/2021

**Time From (वेळेपासून):** 12:48 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:48 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/05/2021 **Time (वेळ):** 21:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 040 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/05/2021 22:09 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 16 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** एम एस ई बी कार्यालय, वाठार ,कराड

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दिलीप शंकर पाटील

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | आटके ,कराड ,कराड तालुका,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | आटके ,कराड ,कराड तालुका,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9823771273

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल अशोक सोनवले | | | 1. हजारमाची गजानन सोसायटी एम एस ई बी रोड कराड ,कराड ,कराड तालुका, सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000 रुपये रोख रक्कम | 5,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)): 5,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

खबरी जबाब दिनांक 12/05/2021मी, दिलीप शंकर पाटील, वय 47 वर्षे, शिक्षण 10 वी, व्यवसाय - शेती, मुळ राहणार - मु.पो. आटके, ता. कराड, जि. सातारा, मोबाईल नंबर - 9823771273समक्ष कराड तालुका पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असुन शेती करतो. माझे नावे मौजे जाधवमळा आटके ता. कराड येथे गट नंबर 186 मध्ये 60 गुंठे शेत जमीन असुन सदर जमीनीमध्ये स्वत:ची विहीर आहे. सदर विहीरीतुन शेतीकरीता पाणी उपसा करण्यासाठी 3 एच पीचे नविन विज कनेक्शन मिळणेकामी मी दिनांक 16/03/2020 रोजी रीतसर अर्ज करुन त्या सोबत हमीपत्र जोडुन एम एस ई बी कार्यालय वाठार येथे जमा केला. त्यानंतर मी सदर अर्जाची चौकशी करणेकामी मी एमएसईबी कार्यालय वाठार येथील श्री. सोनवले साहेब यांची वेळोवेळी भेट घेतली. त्यानंतर ऑगस्ट 2020 मध्ये नवीन विज कनेक्शनसाठी डिपझीट भरण्याचा माझ्या मोबाईलवर मेसेज आला. त्याप्रमाणे मी दिनांक 24/08/2020 रोजी मुडे येथील पतसंस्थेमध्ये एमएसईबीचे खात्यावर 11785/- रुपये डिपझीट रक्कम भरली. त्याची पावती घेवुन मी, वाठार येथील कार्यालयात जावुन सोनवले साहेबांची भेट घेतली असता त्यांनी मला, तुमच काम करतो, आमच्या चहा पाण्याच बघा असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना, आधी माझं काम करा त्यानंतरच मी तुमच काही तरी बघेन असे नाईलाजाने म्हणालो. त्यानंतर मी, शेतीसाठी नवीन विज कनेक्शन मिळणेसाठी मी वेळोवेळी सोनवले साहेब यांची भेट घेतली परंतु त्यांनी माझ्या कनेक्शनचे काम केले नाही. त्यानंतर मी दिनांक 11/05/2021 रोजी वाठार येथील कार्यालयात जावुन सोनवले साहेबांची भेट घेतली व माझ्या शेतीपंपासाठी नवीन विज कनेक्शनबाबत विचारपुस केली, त्यावेळी सोनवले साहेब यांनी मला, तुमचे कनेक्शन देतो पण तुम्हाला 15,000/- रुपये खर्च करावा लागेल असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन घरी निघुन गेलो.एमएसईबी कार्यालय वाठार येथील सोनवले साहेब हे माझे शेतीकरीता 3 एच पीचे नवीन विज कनेक्शन देण्यासाठी माझ्याकडुन 15,000/- रुपयांची लाच स्विकारल्याशिवाय ते मला नवीन विज कनेक्शन देणार नाही अशी माझी खात्री झाल्याने मी दिनांक 11/05/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात फोन करुन पोलीस निरीक्षक श्री. अविनाश जगताप साहेब यांना माझी वरील प्रमाणे तक्रार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. जगताप साहेब, पोलीस निरीक्षक यांनी मला दिनांक 12/05/2021 रोजी 10.30 वाजता कराड येथील पाचवड फाटा येथे येवुन थांबण्याची सुचना दिली.त्यानंतर दिनांक 12/05/2021 रोजी श्री.जगताप साहेब, पोलीस निरीक्षक यांनी कराड येथील पाचवड फाटा येथे येवुन माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. जगताप साहेब, हे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. जगताप साहेबांनी, माझी व तालुका कृषी अधिकारी सातारा या कार्यालयातील 1) मंगेश अशोक गुरव, कृषी सहायक व 2) विनायक प्रल्हाद कोरडे, कृषी सहायक या दोन पंचांसह व सापळा पथकाची ओळख



Scanned with CamScanner

करुन दिली. त्यानंतर मी, माझा लेखी तक्रारी अर्ज व सह कागदपत्रे श्री.जगताप साहेबांकडे हजर केले. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन करुन त्यावर सह्या केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे? याची पडताळणी करण्यासाठी पंच नं. 1 म्हणुन मंगेश गुरव व पंच नं. 2 म्हणुन विनायक कोरडे यांनी काम करण्याचे जगताप साहेबांनी ठरवुन मला व पंच नं. 1 यांना सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह माझा पुतण्या श्री. रोहन पाटील यांचे चारचाकीमध्ये पुतण्यासह, मला पंच नं. 1 यांचेसोबत सोनवले साहेब यांची भेट घेण्यासाठी रवाना करुन पडताळणी केली असता त्यामध्ये माझी व एमएसईबी कार्यालय वाठार येथील सोनवले साहेब यांची समक्ष भेट झाली. त्यावेळी सोनवले साहेब यांनी माझ्या शेतामधील शेती पंपास 3 एच पीचे नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी माझ्याकडे तडजोडीअंती 5000/- रुपयांची मागणी करुन लागलीच आणुन देण्यास सांगितल्याची रेकर्ड झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन जगताप साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर जगताप साहेब यांचे सुचनेनुसार मी 5000/- रुपये हजर केले. त्या नोटांचे क्रमांक एका कोऱ्या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रक्मेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने जगताप साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्या पुतण्याचे चारचाकी वाहनातुन सोनवले साहेब यांची यांची भेट घेण्याकामी एम एस ई बी कार्यालय वाठार येथे रवाना केले. मी व पंच नं. 1 असे माझ्या पुतण्याचे चारचाकी वाहनातुन वाठार येथील एमएसईबी कार्यालयाचे समोर गेलो. त्याठिकाणी माझ्या पुतण्याने त्याचेकडील चारचाकी वाहन पार्क केले. त्यावेळी पुतण्या वाहनातच थांबुन राहिला. त्यानंतर मी व पंच नं. 1 गुरव असे चालत एमएसईबी कार्यालयात गेलो. त्याठिकाणी सोनवले साहेबांचे केबीनचे बाहेरील कर्मचाऱ्याने मला, थांबा बाहेर, येतील साहेब बाहेर असे म्हणुन सोनवले साहेबांचे केबीनमध्ये जाण्यापासुन रोखले. त्यावेळी मी व पंच नं.1 गुरव असे सोनवले साहेबांचे केबीनचे बाहेर थांबुन राहिलो. काही वेळाने लोकसेवक सोनवले साहेब त्यांचे केबीनमधुन फोनवर बोलत बोलत बाहेर आहे. त्यावेळी सोनवले साहेबांनी मला, हाताने इशारा करुन त्यांचे पाठोपाठ येण्यास सांगितले. त्यावेळी मी व पंच नं. 1 असे सोनवले साहेब यांचे पाठोपाठ कार्यालयातुन बाहेर आलो. त्यावेळी सोनवले साहेबांनी मला, दिलीपराव अस नाय करायच मी तुम्हाला फोन लावा म्हणलेलो असे म्हणाले. त्यावर मी, आता म्हणल येतो म्हणल असे सांगितले. त्यावर सोनवले साहेब यांनी, ओके, करा होतय . .किती हाय असे म्हणत त्यांचे उजव्या हाताचा अंगठा तर्जनिवर घासुन मला लाच मागणीचा इशारा केला. त्यावेळी मी, माझ्या उजव्या हाताने शर्टचे छातीवरील डाव्या खिशामध्ये ठेवलेली 5000/- रुपये लाच रक्कम काढुन सोनवले साहेब यांचे समोर धरुन पाच, मोजुन बघा की असे म्हणालो. त्यावर सोनवले साहेब यांनी माझ्याकडुन 5000/- रुपये लाच रक्कम डाव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन ठिकाय असु द्या असे म्हणुन त्यांचे पन्टचे पाठीमागील डाव्या बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर माझ्यात व सोनवले साहेब यांचेमध्ये माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. तो इशारा पाहुन श्री. जगताप साहेब व पथक माझ्या जवळ आले. श्री. जगताप साहेबांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन बंद केला व मला थोडे बाजुला थांबण्यास सांगितले. काही वेळाने श्री. जगताप साहेबांनी मला, एमएसईबी वाठार कार्यालयात बोलावुन माझी अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळहातास तसेच माझ्या शर्टचे छातीवरील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस व कडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर जगताप साहेब यांनी मला माझ्या शर्टच्या छातीवरील डावे खिशात ठेवलेल्या लाच रकमे बाबत विचारता मी 5000/- रुपये लाच रक्कम सोनवले साहेब यांनी मागणी केले प्रमाणे त्यांना दिली असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री. जगताप साहेब यांनी मला कळविले की, सोनवले यांना ताब्यात घेवुन त्यांची एमएसईबी वाठार कार्यालयातच तपासणी केली त्यावेळी त्यांचे दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळ हातास तसेच त्यांचे पँटचे पाठीमागील डाव्या बाजुचे खिशाचे आतील बाजुस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर श्री. जगताप साहेब यांनी सोनवले साहेब यांना ताब्यात घेवुन सर्व पथकासह खाजगी वाहनाने तसेच मी व माझा पुतण्या आमचेकडील चारचाकी वाहनाने कराड येथील शासकिय विश्रामगृह येथे दाखल झालो. त्यावेळी जगताप साहेबांनी मला विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगितले. काही वेळाने श्री. जगताप साहेब यांनी मला विश्रामगृहात बोलावुन घेवुन पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर जगताप साहेबांनी, माझे व पंच नं. 1 गुरव यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा विश्रामगृहाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा विश्रामगृहात बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली त्यावेळी मी पंच नं. 1 यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा शासकिय विश्रामगृह कराड येथे टंकलिखीत करुन पुर्ण केला आहे. तरी दिनांक 12/05/2021 रोजी पडताळणी व सापळा कारवाईवेळी लोकसेवक राहुल अशोक सोनवले, वय 38 वर्षे, पद - कनिष्ट अभियंता, एमएसईबी कार्यालय वाठार यांनी माझ्याकडे, माझ्या शेतामधील शेतीपंपास 3 एच पीचे नवीन वीज कनेक्शन देण्यासाठी तडजोडीअंती 5000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक 12/05/2021 रोजी सापळा कारवाईमध्ये एम एस ई बी कार्यालय, वाठार ता. कराड येथे 12.48 वाजण्याचे सुमारास स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे. माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला असुन बरोबर आहे. समोर ही खबर दिली

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Balasaheb Rashik Bharne(I (Inspector)) / 15101000402BRPM7101Z **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(व्ही एच रकाडे)

**Signature of Officer in charge, Police Station** पोलीस स्टेशन ऑफीसर ...याची

**Name** (नाव): ... तालुका पोलीस स्टेशन ...harne

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402BRPM7101Z



Scanned with CamScanner